**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित**
**ग्राहक तक्रार निवारण मंच**
**कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर**

MAHADISCOM
Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.

सं.क्र.काअ/ग्रातनिमं/कोप/केस क्र. १७/२०१७-१८/२५८ दिनांक: ११.०८.२०१७

**आदेश**

**आदेश केस क्र. १७/२०१७-२०१८**

| | | |
|---|---|---|
| १) श्री. सोमाजी सखाराम वाघमोडे<br>मु. पो. कोडोली<br>ता.पन्हाळा, जिल्हा. कोल्हापूर | : | **तक्रार अर्जदार (ग्राहक)** |
| **विरुध्द** | | |
| १) कार्यकारी अभियंता (का) तथा नोडल ऑफीसर,<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>मंडल कार्यालय, कोल्हापूर<br><br>२) कार्यकारी अभियंता,<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>ग्रामिण विभाग-१ कोल्हापूर<br><br>३) उपकार्यकारी अभियंता,<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>उपविभाग कोडोली | | **विरुध्द पक्षकार** |

**कोरमः-** १. श्री. प्र.वि. खपली, सदस्य सचिव,
२. श्री. पी. एस. बुरांडे, ग्राहक सदस्य,

महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

**निर्णय**

मी प्र.वि.खपली सदस्य सचिव, ग्राहक तक्रार.निवारण मंच. कोल्हापूर, खालीलप्रमाणे निर्णय देत आहे.

CONSUMER GRIEVANCE REDRESSAL FORUM, KOLHAPUR
MAHARASHTRA STATE ELECTRICITY DIST. CO.

१) तक्रारदार श्री सोमाजी सखाराम वाघमोडे, रा.कोडोली ता. पन्हाळा जि. कोल्हापूर यांनी सदर गा-हाणे अपिल, त्यांना शेती पंपासाठी नविन वीज जोडणी त्वरीत मिळणेसाठी दिनांक २४.०५-२०१७ रोजी दाखल केले आहे.

## गा-हाण्याचे संक्षिप्त स्वरुप.

२) तक्रारदार यांचे म्हणणे असे की, त्यांनी शेती पंपासाठी नविन वीज जोडणी मिळणेसाठी रितसर अर्ज वि.प. यांचेकडे सादर करुन नंतर आवश्यक ती रक्कम भरणा केली. परंतु त्यांना वीज जोडणी मिळाली नाही म्हणून त्यांनी अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, कोल्हापूर यांचेकडे तक्रार दाखल केली. सदर कक्षाने दिनाक ०४.०५.२०१७ च्या आदेशाने ग्राहकाची त्वरीत विज जोडणीची मागणी फेटाळण्यात येत आहे. असा निर्णय दिला. त्याने समाधान झाले नसल्यामुळे या मंचाकडे प्रस्तुत अपिल दाखल केले आहे.

## वि. प. यांची भूमिका.

३) तक्रारदार यांनी वरील प्रमाणे अर्ज दि. ३०-०६-२०१४ रोजी दाखल करुन दि. १३-०३-२०१५ रोजी रक्कम भरणा केली हे वि.प. यांना मान्य आहे. तक्रारदार यांना वीज जोडणी देणेसाठी ०.१८ कि.मी लघुदाब वाहिनी आवश्यकता आहे. सदर कामास इन्फ्रास्ट्रक्चर लागत असून तक्रारदाराचे नाव कोडोली उपविभागीय कार्यालयाच्या प्रतिक्षा यादीत नोंद केले आहे.नियमानुसार त्यांना वीज जोडणी देणेत येत आहे.

४) कोडोली उपविभाग अतंर्गत असणारी शेती पंपाकरिता आवश्यक असणारी विद्युत संच उभारणीची कामे ही प्रतिक्षा यादी मधील दि. २३-०७-२०१४ अखेरपर्यन्तची इन्फ्रा लेफ्ट .आऊट या टेंडर मधून पूर्ण करणेत आलेली आहेत. सदर ग्राहकाचे नाव सन-२०१४-१५ सालातील प्रतिक्षा यादीमध्ये १८ व्या क्रमांकास असून सदर आवश्यक ०.१८ कि.मी. लघुदाब वाहिनी उभारणीचे काम पूर्ण झालेनंतर ग्राहकास विद्युत जोडणी देता येणे शक्य आहे.

५) या प्रकरणाची सुनावणी दिनांक १०-०८-२०१७ रोजी मंचासमोर घेणेत आली. त्यावेळी तक्रारदार स्वतः हजर होते. वि.प. तर्फे उपकार्यकारी अभियंता श्री अमर दादासो कोळी हजर होते. त्यांचे तोंडी युक्तिवाद ऐकणेत आले. उपलब्ध कागदपत्रे वाचणेत आली आहेत.

६) या मंचाच्या निर्णयासाठी खालील मुद्दे उपस्थित होत आहेत.

१) तक्रारदार यांना त्यांच्या मागणीनुसार शेती पंपासाठी नवीन वीज जोडणी निश्चित कालावधीत देण्याचा आदेश करणे योग्य होईल काय?

उत्तरः- होय.

२) कोणता अंतिम आदेश?

उत्तरः- शेवटी नमूद केल्याप्रमाणे.

CONSUMER GRIEVANCE REDRESSAL FORUM, KOLHAPUR ZONE
MAHARASHTRA STATE ELECTRICITY DIST. CO. LTD.
महावितरण

**कारणमिमांसा**

७) नविन वीज जोडणी लौकरात लौकर मिळावी एवढीच विनंती तक्रारदार यांनी मंचासमोर केली आहे. त्यांनी वि.प.कडे रक्कम भरल्यानंतर त्यांना नियमानुसार तीन महिन्यात वीज जोडणी मिळालेली नाही. तक्रारदार यांना वीज पुरवठा करण्यासाठी वर परिच्छेद-३ मध्ये नमूद केल्याप्रमाणे लघुदाब वाहिनीचा विस्तार करावा लागणार आहेत. नविन उपकेंद्र उभारणेची गरज नाही. तक्रारदार यांची नावे प्रतिक्षायादीत विशिष्ट क्रमांकास नोंद आहेत. याबाबत फारसा विचार करता येणार नाही.

८) विशिष्ट मुदतीत वीज पुरवठा देणे कायद्याने वि.प. यांचेवर बंधनकारक आहे. तसे न केल्यास विद्युत कायदा २००३ च्या कलम ४३(३) मध्ये दंडात्मक तरतूद केली आहे. कृतीमानके विनियमाप्रमाणे वीज जोडणी देण्यात विलंब झाल्यास भरपाई देण्याची तरतूदही विद्युत नियामक आयोगाने केली आहे. त्यामुळे "प्रथम येणा-यास प्रथम प्राधान्य" तत्वाचा उपयोग वि.प. यांना करता येत नाही.

९) या केसमध्ये तक्रारदार यांनी ३ महिन्यामध्ये विज पुरवठा मिळाल्यास नुकसान भरपाईची मागणी रद्द करण्याचे मंचासमोर तोंडी मान्य केले आहे.

**आदेश**

१) तक्रारदार यांना त्यांच्या मागणी प्रमाणे शेती पंपासाठी नविन वीज जोडणी वि.प. यांनी दि. १५.११.२०१७ पर्यन्त देऊन वीज पुरवठा चालू करावा असा वि.प. यांना आदेश देणेत येत आहे.

२) सदर आदेशाची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ ८.७ नुसार वि.प. यांनी मंचास कळवावे.

४) या निर्णयाविरुध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा. बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स,बांद्रा (पूर्व) मुंबई यांजकडे करता येईल

एकमताच्या / बहुमताच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.

दिनांक ०१.०७.२०१७ पासून अध्यक्ष पद रिक्त आहे.

(श्री प्र. स. बुरांडे)
ग्राहक सदस्य

(प्र.वि. खपली)
सदस्य सचिव

MAHARASHTRA STATE ELECTRICITY DIST. CO. LTD. CONSUMER GRIEVANCE REDRESSAL FORUM, KOLHAPUR ZONE